जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३७८ दिनांक - २२/०५/२०२३**

## गुन्हे शाखा,युनिट-२,पुणे शहर

## आंबेगाव बुद्रुक मधील,सोसायटी मध्ये घुसुन खुनाचा प्रयत्न करुन,धुडगूस घालणा-या गणेश ऊर्फ भावडया व त्याच्या इतर साथीदारांना १२ तासाचे आत केले जेरबंद

गुन्हे शाखा युनिट-२ चे प्रभारी अधिकारी श्री.क्रांतीकुमार पाटील, पोउपनिरी.राजेंद्र पाटोळे व युनिट-२ कडील पोलीस अंमलदार यांना पुणे शहरातील पाहिजे आरोपी,फरारी आरोपी व रेकार्डवरील आरोपीतांचा शोध घेवुन कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेश दिले होते. भारती विदयापीठ पोलीस स्टेशन येथे दिनांक २१/०५/२०२३ रोजी खुनाचा प्रयत्न केलेबाबत गंभीर गुन्हा दाखल झाला असुन,सदर गंभीर गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेणेबाबत वरिष्ठांकडून आदेश प्राप्त झाले होते.

त्याप्रमाणे युनिट-२ चे प्रभारी श्री.क्रांतीकुमार पाटील यांनी पोलीस उप निरीक्षक,राजेंद्र पाटोळे यांचे सोबत अंमलदार याचे पथक तयार केले होते. सदर पथक गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेत असताना, **पोलीस अंमलदार,उज्वल मोकाशी व संजय जाधव** यांना बातमीदारा मार्फतीने बातमी मिळाली की,सदर गुन्हयातील आरोपी आंबेगाव-बुद्रुक स्मशान भुमीजवळ लपुन बसलेले आहेत. त्याप्रमाणे,युनिट प्रभारी अधिकारी यांना अवगत करुन,त्यांचे मार्गदर्शनाखाली नमुद पथकाने गंभीर गुन्हयातील आरोपी **१)करण रवि पटेकर ऊर्फ कोळगे,वय-२० वर्ष,रा.भुमकर ब्रिज बालाजी पार्क समोर,फ्लॅट नंबर १०१,न-हे,पुणे २)गणेश बाबु ओव्हाळ ऊर्फ भावडया,वय-२४ वर्ष,रा.जय महाराज चौक,आंबेगाव,पुणे ३)भिमश्या सुरेश मुडावत ऊर्फ चव्हाण,वय-१९ वर्ष,रा.अमित बिल्डिंग शेजारी,रसना हाईट,फ्लॅट क्रमांक ४०१,आंबेगाव-बुद्रुक,पुणे यांना ताब्यात घेतले.** सदरबाबत भारती विदयापीठ पोलीस स्टेशन येथे खात्री करता,त्यांचे विरोधात **भारती विदयापीठ पोलीस स्टेशन गु.र.क्र.३१७/२०२३,भा.द.वि.कलम ३०७,३२३,५०४,५०६,१४३,१४८,१४९,४२७, आर्म ॲक्ट कलम ४(२५),मपोॲक्ट ३७(१)(३)१३५** अन्वये गुन्हा दाखल असलेबाबत माहिती प्राप्त झाली. नमुद आरोपीतांची ससुन हॉस्पीटल येथे वैदयकिय तपासणी करुन पुढील कायदेशीर कारवाईकामी भारती विदयापीठ पो.स्टे.पुणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास भारती विदयापीठ पोलीस स्टेशन हे करीत आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा.अप्पर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे, श्री.अमोल झेंडे,मा.सहा.पो.आयुक्त,गुन्हे,श्री.सुनिल पवार यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक,श्री.क्रांतीकुमार पाटील,सपोनि.विशाल मोहिते,पोउपनि.राजेंद्र पाटोळे,पोलीस अंमलदार,संजय जाधव,उज्वल मोकाशी,शंकर नेवसे,नामदेव रेणुसे,मोहसिन शेख,उत्तम तारु,विजय पवार,गणेश थोरात, अमोल सरडे,गजानन सोनुने, निखिल जाधव,पुष्पेंद्र चव्हाण व नागनाथ राख यांनी केली आहे.